## -: परीक्षा योजना/पध्दती :-

## महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील खालील संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात :-

| अ. क्र. | संवर्ग/पदाचे नांव | संवर्ग | वेतनसंरचना (Pay Matrix) | नियुक्तीचे ठिकाण | उच्च पदावर पदोन्नतीच्या संधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहायक कक्ष अधिकारी | अराजपत्रित गट-ब | S-१४ : रुपये ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय इतर भत्ते. | विविध मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे कार्यालय | ज्येष्ठता व पात्रतेनुसार कक्ष अधिकारी व त्यावरील पदे. |
| २ | राज्य कर निरीक्षक | | | राज्य शासनाच्या वस्तू व सेवा कर विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार राज्य कर अधिकारी व त्यावरील पदे. |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | | | राज्य शासनाच्या पोलीस दलाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात | ज्येष्ठता व पात्रतेनुसार सहायक पोलीस निरीक्षक व त्यावरील पदे. |
| ४ | दुय्यम निबंधक(श्रेणी-१)/ मुद्रांक निरीक्षक | | | राज्य शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही कार्यालयात. | ज्येष्ठता व पात्रतेनुसार उपमुद्रांक अधीक्षक व त्यावरील पदे. |

**१.२** शासनाच्या मागणीनुसार सदर परीक्षेमधून भरतीप्रक्रिया राबविण्याचे प्रस्तावित असलेल्या सर्व संवर्गाचा तपशील, अराखीव व विविध आरक्षित पदसंख्या, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात/अधिसूचनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षा पध्दती:-**

**२.१** प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या सर्व संवर्गातील पद भरतीकरीता एकच संयुक्त पूर्व परीक्षा घेण्यात येईल.

**२.२** महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन, अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडून आयोगाच्या संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने अर्ज घेण्यात येतील.

**२.३** संयुक्त पूर्व परीक्षेकरीता भरावयाच्या अराखीव व आरक्षित एकूण पदसंख्येच्या आधारे, मुख्य परीक्षेसाठी पात्र करावयाच्या उमेदवारांची संख्या निश्‍चित करुन, सामाईक पूर्व परीक्षेमधील उमेदवारांच्या गुणांच्या आधारे गट-ब सेवेकरीता एकत्रित निकाल जाहीर करण्यात येईल.

**२.४** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या गुणांची किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

**२.५** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत.

**२.६** संयुक्त पूर्व परीक्षेच्या एकत्रित निकालाच्या आधारे गट-ब सेवेच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उपरोक्त चारही संवर्गांसाठी एकच संयुक्त मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**२.७** प्रस्तुत मुख्य परीक्षेकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडून अधिसूचनेमध्ये नमूद संवर्गापैकी एक किंवा त्यापेक्षा जास्त संवर्गासाठी बसू इच्छितात किंवा कसे, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

**२.८** प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी गट-ब सेवेतील संवर्गासाठी ऑनलाईन अर्ज सादर करताना पात्रतेच्या आधारे उमेदवारांनी संबंधित संवर्गाकरीता दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित संवर्गाच्या पद भरतीकरीता उमेदवाराचा अर्ज समजण्यात येईल/येतील व सदर विकल्पाच्या आधारे पुढील भरतीप्रक्रिया राबविण्यात येईल.

**२.९** संयुक्त मुख्य परीक्षेस अर्ज करताना दिलेला/ले विकल्प तसेच संवर्गनिहाय भरावयाच्या पदसंख्येच्या तसेच पात्रतेच्या आधारे संबंधित संवर्गाकरीता अर्हताप्राप्त ठरणाऱ्या उमेदवारांसाठी स्वतंत्र संवर्गनिहाय निकाल जाहीर करण्यात येईल.

**२.१०** मुख्य परीक्षेसाठी गट-ब सेवेतील संबंधित संवर्गाकरीता उमेदवारांनी दिलेल्या विकल्पाच्या आधारे मुख्य परीक्षेचा संवर्गनिहाय स्वतंत्र निकाल जाहीर करण्यात येईल.

**२.११** प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी अर्ज सादर करताना अर्जामध्ये नमूद केलेली माहिती व विविध संवर्गांसाठी दिलेले विकल्प यामध्ये निवडप्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बदल करण्याबाबतची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येणार नाही.

**२.१२** जाहिरातीस अनुसरून पूर्व/मुख्य परीक्षेकरीता अर्जाद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रे/पुरावा सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन व आयोगाची फसवणूक समजून आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

**३. पात्रता :-**

**३.१** भारतीय नागरिकत्व.

**३.२ वयोमर्यादा :-**

**३.२.१** वयोमर्यादा गणण्याचा दिनांक :- जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे

**३.२.२** विविध आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गांसाठी किमान व कमाल वयोमर्यादा :-

| अ. क्र. | संवर्ग | वयोमर्यादा गणण्याचा दिनांक | वय | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | किमान अमागास / मागासवर्गीय / आ. दु. घ. | कमाल | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी | | दिव्यांग उमेदवार |
| | | | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ आ. दु. घ. | अमागास | मागासवर्गीय/ आ. दु. घ. | |
| १ | सहायक कक्ष अधिकारी | जाहिरातीमध्ये नमूद दिनांक | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| २ | राज्य कर निरीक्षक | | १८ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |
| ३ | पोलीस उप निरीक्षक | | १९ | ३१ | ३४ | ३६ | ३६ | ३६ | ३६ | अपात्र |
| ४ | दुय्यम निबंधक(श्रेणी-१)/ मुद्रांक निरीक्षक | | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | ४३ | वयाच्या ४५ वर्षापर्यंत |

**३.२.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल करण्यात येणार नाही.

**३.३. अर्हता:-**

**३.३.१ शैक्षणिक अर्हता:-**

**(एक)** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतुल्य अर्हता.

**(दोन)** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**(तीन)** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**(चार)** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेचा अर्ज/माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

**३.३.२ शारीरिक पात्रता:-**

**(एक)** पोलीस उपनिरीक्षक पदासाठी विकल्प नमूद करणा-या उमेदवारांकडे उपरोक्त अर्हतेसोबत खालीलप्रमाणे किमान शारीरिक पात्रता असणे आवश्यक आहे :-

| पुरुषांसाठी / स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता | महिलांसाठी / स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीयपंथी अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता |
|---|---|
| (१) उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>(२) छाती - न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |

**(दोन)** पोलीस उपनिरीक्षक पदावरील नियुक्तीकरीता शिफारस झालेल्या उमेदवारांची शारीरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. वरीलप्रमाणे विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**४. शुल्क (फी):-**

**४.१** प्रस्तुत भरतींकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | शुल्क रुपये | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग/आ.दु.घ./अनाथ |
| १ | संयुक्त पूर्व परीक्षा | ३९४ | २९४ |
| २ | मुख्य परीक्षा | ५४४ | ३४४ |

**४.२** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागासप्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.३ उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेअर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्‌अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**५. परीक्षा केंद्र:-**

**५.१** संयुक्त पूर्व परीक्षा खालील ठिकाणी घेण्यात येईल:-

| केंद्र | सांकेतांक | केंद्र | सांकेतांक | केंद्र | सांकेतांक | केंद्र | सांकेतांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | ११ | गडचिरोली | २१ | नागपूर | ३२ | सोलापूर | ४२ |
| अकोला | १२ | गोंदिया | २२ | नांदेड | ३३ | ठाणे | ४३ |
| अलिबाग | १३ | हिंगोली | २३ | नंदुरबार | ३४ | वर्धा | ४४ |
| अमरावती | १४ | जळगाव | २४ | नाशिक | ३५ | वाशिम | ४५ |
| छत्रपती संभाजीनगर | १५ | जालना | २५ | धाराशिव | ३६ | यवतमाळ | ४६ |
| बीड | १६ | कोल्हापूर | २६ | परभणी | ३७ | पालघर | ४७ |
| भंडारा | १७ | कुडाळ | २७ | पुणे | ३८ | नवी मुंबई | ४८ |
| बुलढाणा | १८ | लातूर | २८ | रत्नागिरी | ३९ | | |
| चंद्रपूर | १९ | मुंबई (मध्य) | ३० | सांगली | ४० | | |
| धुळे | २० | मुंबई (पश्चिम) | ३१ | सातारा | ४१ | | |

**५.२** मुख्य परीक्षा सर्वसाधारणपणे खालील सहा ठिकाणी घेण्यात येतील:-

| जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक | जिल्हा केंद्र | जिल्हा केंद्राचा सांकेतांक |
|---|---|---|---|
| (१) अमरावती | **१४** | (४) नागपूर | **३२** |
| (२) छत्रपती संभाजीनगर | **१५** | (५) नाशिक | **३५** |
| (३) नवी मुंबई | **४८** | (६) पुणे | **३८** |

**५.३** उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक जिल्हाकेंद्र संबंधित परीक्षेकरीता अर्ज सादर करतानाच निवडणे आवश्यक आहे.

**५.४** उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.५** विहित पध्दतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवारांने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.६** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**५.७** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही, तसेच यासंदर्भातील कोणताही पत्रव्यवहार परस्पर दफ्तरदाखल करण्यात येईल.

**६. परीक्षा योजना :-**

**६.१ संयुक्त पूर्व परीक्षा :-**

**६.१.१ पूर्व परीक्षेचे स्वरुप :- लेखी परीक्षा**

| विषय व सांकेतांक | प्रश्नांची संख्या | एकूण गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| **सामान्य क्षमता चाचणी (११२१)** | १०० | १०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.१.२ अभ्यासक्रम** :-सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘Candidate Information’ या सदराखालील ‘Examination’ अंतर्गत ‘Syllabus of Examination’ येथे उपलब्ध आहे.

**६.२ मुख्य परीक्षा:-**

**६.२.१ मुख्य परीक्षेचे टप्पे —**

| अ.क्र. | परीक्षा | संवर्ग | टप्पे |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा मुख्य परीक्षा | (१) सहायक कक्ष अधिकारी<br>(२) राज्य कर निरीक्षक<br>(३) दुय्यम निबंधक(श्रेणी-१) / मुद्रांक निरीक्षक | फक्त लेखी परीक्षा |
| | | (४) पोलीस उप निरीक्षक | (१) लेखी परीक्षा<br>(२) शारीरिक चाचणी<br>(३) मुलाखत |

**६.२.२ मुख्य परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे:-**

| पेपर क्रमांक व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **(१) महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा मुख्य परीक्षा** | | | | | | | |
| १ (संकेतांक १०६२) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (संकेतांक १०६३) | सामान्य अध्ययन व बुध्दिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | |

**६.२.३ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील 'Candidate Information' या सदराखालील 'Examination' अंतर्गत 'Syllabus of Examination' येथे उपलब्ध आहे.

**६.३ उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन:-**

**६.३.१** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना, उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच, प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.३.२** एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.३.३** एखादा प्रश्न अनुत्तरित असेल तर अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही.

**६.३.४** वरीलप्रमाणे कार्यपद्धतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच गणण्यात येईल व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल.

**६.४ पूर्व परीक्षेचा निकाल :**

**६.४.१** संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन भरावयाच्या अराखीव व आरक्षित पदसंख्येच्या आधारे गट-ब सेवेकरीता एकूण पदांच्या सुमारे १२ पट उमेदवार गट-ब सेवेच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक आरक्षित प्रवर्गातील पदांसाठी १२ पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने गुणांची किमान सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुसऱ्या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या आरक्षित पदावरच निवडी/शिफारशीसाठी पात्र असतील.

**६.४.२** अराखीव (खुला) पदांकरींता निश्चित करण्यात आलेल्या गुणांच्या किमान सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी अराखीव (खुला) पदासाठी विचारात घेतली जाईल. अराखीव (खुला) पदासाठी निश्चित करण्यात आलेली गुणांची किमान सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदावरील निवडीसाठी पात्र ठरतील.

**६.४.३** प्रत्येक प्रवर्ग/ उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या गुणांच्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना त्यांनी संयुक्त पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात संबंधित मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.४.४** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल व निकाल जाहीर झाल्याबाबतची माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तथापि, लघुसंदेशाद्वारे वैयक्तिकरित्या कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल.

**६.४.५** संयुक्त पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६.५ मुख्य परीक्षा :-**

**६.५.१ स्वरुप:-** महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवेच्या मुख्य परीक्षेकरीता विहित करण्यात आलेल्या परीक्षा योजना व अभ्यासक्रमानुसार गट-ब (अराजपत्रित) सेवेकरीता वस्तुनिष्ठ/बहुपर्यायी स्वरुपाची एकच संयुक्त मुख्य परीक्षा घेण्यात येईल.

**६.५.२ परीक्षेस प्रवेश:-**

**(एक)** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून जाहिरात/अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून विहित करण्यात आलेल्या पद्धतीने जिल्हा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**(दोन)** संयुक्त मुख्य परीक्षेच्या जाहिरातीस/अधिसूचनेस अनुसरुन, अर्ज करणा-या उमेदवारांकडून ते महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवेतील एक किंवा त्यापेक्षा जास्त संवर्ग/पदांसाठी बसू इच्छितात किंवा कसे, याबाबत विकल्प (Option) घेण्यात येईल.

**(तीन)** संबंधित संवर्ग/पदाकरीता उमेदवाराने दिलेला/ले विकल्प हा/हे संबंधित पद भरतीकरीता अर्ज समजण्यात येईल/येतील.

**(चार)** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाकडून निश्चित केलेल्या सीमांकन रेषा व मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरणाऱ्या तसेच जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदींनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**(पाच)** प्रस्तुत पदाच्या संयुक्त पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता, मुख्य परीक्षेकरिता आवश्यक अर्ज/माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**७. निकाल प्रक्रिया:-**

**७.१** महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) संयुक्त मुख्य परीक्षा मधून भरावयाच्या **सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक दुय्यम निबंधक/मुद्रांक निरीक्षक-श्रेणी-१** संवर्गाकरीता **संवर्गनिहाय** स्वतंत्र निकाल प्रक्रिया राबविण्यात येईल

**७.२** सामाजिक तसेच समांतर आरक्षणाच्या वैध दाव्यांच्या आधारे संबंधित उमेदवार मुख्य परीक्षेमध्ये केवळ आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विहित केलेल्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ संबंधित आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गाच्या गुणांच्या किमान सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अराखीव (खुला) पदावरील निवड/शिफारसीसाठी विचारात घेतली जाणार नाही.

**७.३** उमेदवाराचा मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करताना दिलेला संवर्गाचा विकल्प विचारात घेऊन पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची संख्या निश्चित करण्यात येईल.

**७.३.३ पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता शारीरिक चाचणी व मुलाखत:-**

**(एक)** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग / उपप्रवर्गासाठी सुमारे ४ पट उमेदवार शारीरिक चाचणीसाठी उपलब्ध होतील, अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.

**(दोन) शारीरिक चाचणी:-**

(१) उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचीच शारीरिक चाचणी घेण्यात येईल. सदर चाचणी पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र असेल.

(२) शारीरिक चाचणीच्या वेळी उंची व छातीविषयक विहित मोजमापाच्या अटी पूर्ण न करणाऱ्या उमेदवारांची उंची / छाती मापनाविषयी काही तक्रार असल्यास त्यांनी त्याच दिवशी आयोगाकडे आपला तक्रार अर्ज सादर करणे आवश्यक आहे. याबाबत योग्य तो विचारविनिमय करुन अपात्र उमेदवारांच्या उंची / छातीचे फेरमापन घेण्याकरिता उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(५) आयोगाच्या वेळापत्रकानुसार अशा उमेदवारांच्या उंची व छातीविषयक फेरमोजमापनाकरिता दिनांक, वेळ व ठिकाण निश्चित करण्यात येईल.

(६) फेरमापनाच्या अनुषंगाने पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची शारीरिक चाचणी त्याच दिवशी अथवा आयोगाकडून निश्चित करण्यात येणाऱ्या दिनांकास घेण्यात येईल. तसेच शारीरिक चाचणीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

(७) शारीरिक चाचणी एकूण १०० गुणांची असेल.

(८) शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी (Qualifying) स्वरुपाचे असून एकूण गुणांपैकी किमान ६० टक्के गुण (म्हणजेच ६० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरीता/अंतिम निवडीकरीता विचार होणार नाही.

(९) शारीरिक चाचणीतील एकूण गुणांची बेरीज अपूर्णांकात असल्यास ती अपूर्णांकातच ठेवण्यात येईल.

**(१०) शारीरिक चाचणीचा तपशील:-**

| **पुरुषांसाठी / स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता** | **महिलांसाठी / स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीयपंथी अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरीता** |
|---|---|
| (१) धावणे (८०० मीटर ) - कमाल गुण - ५० | (१) धावणे (४०० मीटर ) - कमाल गुण - ५० |
| (२) पुल अप्स - कमाल गुण - २० | (२) लांब उडी - कमाल गुण - ३० |
| (३) गोळाफेक-वजन-७.२६० कि.ग्रॅ. - कमाल गुण - १५ | (३) गोळाफेक-वजन-४ कि.ग्रॅ.- कमाल गुण - २० |
| (४) लांब उडी - कमाल गुण - १५ | |

(११) शासन अधिसूचना, गृह विभाग, दिनांक २२ जून, २०२३ अनुसार तृतीय पंथी व्यक्तींनी जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करताना स्वत:ची लिंग ओळख पुरुष, महिला किंवा तृतीय पंथी असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

(१२) तृतीयपंथी उमेदवारास त्यांची पुरुष, महिला किंवा तृतीयपंथी अशी स्वत:ची लिंग ओळख निश्चित करणे आवश्यक राहील व यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र शारीरिक चाचणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

(१३) पोलीस उपनिरीक्षक पदावरील नियुक्तीकरीता शिफारस झालेल्या उमेदवारांची शारिरिक मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-यांकडून तपासून घेण्यात येतील. वरील परिच्छेद ३.३.२(एक) प्रमाणे विहित शारीरिक पात्रता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**(तीन) मुलाखत:-**

**(१)** शारीरीक चाचणीच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

**(२)** पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता मुलाखत ४० गुणांची असेल.

**(३)** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**७.४ गुणवत्ता यादी:-**

**(१)** पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता शारीरिक चाचणी व मुलाखतीनंतर मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तयार करण्यात येईल.

**(२)** सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, दुय्यम निबंधक(श्रेणी-१) / मुद्रांक निरीक्षक संवर्गातील निवडीकरीता संयुक्त मुख्य परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या एकूण गुणांच्या आधारे गुणवत्ताक्रमानुसार **संवर्गनिहाय** सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तयार करण्यात येईल.

**७.५** गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणाऱ्या उमेदवारांची क्रमवारी (Ranking) **आयोगाच्या कार्यनियमावलीतील** तरतुदीनुसार ठरविण्यात येईल.

**७.६ अंतिम निकाल प्रक्रिया**

**७.६.१ भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out):-**

**(१)** प्रथम वरील कार्यपद्धतीनुसार सर्व संवर्गासाठी संवर्गनिहाय स्वतंत्र सर्वसाधारण गुणवत्ता यादी (General Merit List) तसेच तात्पुरती निवड यादी (Provisional Selection List) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**(२)** तात्पुरती निवड यादीच्या आधारे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट) पर्याय सादर करण्यासाठी संबंधित उमेदवारांना ७ दिवसांचा कालावधी देण्यात येईल.

**(३)** आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे उमेदवारांकडून प्राप्त " भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे " हा पर्याय लक्षात घेऊन पोलीस उप निरीक्षक संवर्ग वगळून इतर संवर्गासाठी सुधारीत तात्पुरती निवड यादी तयार करण्यात येईल.

(४) पदभरतीकरीता भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य आहे. यासंदर्भातील इतर कोणत्याही पद्धतीने केलेल्या तसेच नंतरच्या टप्प्यावर भरती प्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय रद्द करण्यासंदर्भात केलेल्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

(५) पोलीस उपनिरीक्षक संवर्गासाठी शारिरीक चाचणी व मुलाखतीनंतर जाहीर केलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता यादी व तात्पुरत्या निवड यादीनुसार भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय उमेदवारांना देण्यात येईल व हा पर्याय विचारात घेऊन पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची अंतिम शिफारस यादी तयार करण्यात येईल.

**७.६.२ संमती विकल्प (Consent Submission) :- (पोलीस उपनिरीक्षक वगळून इतर सर्व संवर्गासाठी)**

(१) उपरोक्तप्रमाणे **भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा पर्याय (Opting Out)** दिल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक संवर्ग वगळून उर्वरित संवर्गासाठी सुधारित तात्पुरती निवड यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

(२) महाराष्ट्र गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षेतील पोलीस उप निरीक्षक संवर्ग वगळता इतर संवर्गाकरीता आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या संवर्गनिहाय सुधारीत तात्पुरत्या निवड यादीमध्ये (Revised Provisional Selection List) उमेदवाराची एकापेक्षा जास्त संवर्गासाठी निवड होत असल्यास अशा उमेदवारांकडून प्रथम पसंती (First Choice) बाबत संमती विकल्प ( Consent Submission) मागविण्यात येईल. उमेदवाराचा विचार फक्त संमती विकल्प दिलेल्या संवर्गासाठी करण्यात येईल.

(३) सदर संमती विकल्प (Consent Submission) आयोगाकडून सुधारीत तात्पुरती निवड यादी (Revised Provisional Selection List) प्रसिद्ध केल्यानंतर उमेदवाराच्या प्रोफाईल मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) एका पेक्षा जास्त संवर्गासाठी उमेदवाराची निवड झाल्यास सुधारीत तात्पुरत्या निवड यादीतील (Revised Provisional Selection List) ज्या एका संवर्गाची निवड उमेदवारास स्वीकारावयाची **असेल**, त्याकरीता उमेदवारास **" स्वीकारले " (Accepted)"** हा पर्याय निवडणे अनिवार्य आहे.

(५) सुधारीत तात्पुरत्या निवड यादीतील (Revised Provisional Selection List) ज्या संवर्गाची निवड उमेदवारास स्वीकारावयाची **नसेल**, त्या संवर्गासाठी उमेदवारास **" Give up"** हा पर्याय निवडणे अनिवार्य आहे.

(६) उमेदवाराने ज्या संवर्गासाठी **" Give up"** हा पर्याय निवडला असेल, त्या संवर्गाकरीता त्यांच्या उमेदवारीचा विचार न करता इतर उमेदवारांचा गुणवत्तेवर विचार करण्यात येईल.

(७) आयोगाकडून निश्चित केलेल्या कालावधीत विहीत ऑनलाईन पध्दतीने संमती विकल्प सादर न केल्यास मुख्य परीक्षेच्या जाहिरातीतील/अधिसूचनेतील संवर्गाच्या क्रमानुसार संबंधित उमेदवाराचा अंतिम निवडीकरीता विचार करण्यात येईल. म्हणजेच उमेदवाराची पसंती मुख्य परीक्षेच्या जाहिरातीतील नमूद संवर्गाच्या क्रमवारीनुसार ग्राह्य धरून प्रथम क्रमांकाच्या संवर्गाकरीता स्वीकारले (Accepted) व उर्वरीत संवर्गाकरीता त्याने Give Up केले असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(८) संवर्गाचे विकल्प, भरतीप्रक्रियेतून बाहेर पडणे (Opting Out) तसेच 'संमती विकल्प (Consent Submission)' याबाबतची कार्यवाही फक्त आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे विहित कालावधीमध्ये करणे अनिवार्य असेल.

(९) भरतीप्रक्रिये दरम्यान विहित कालावधीनंतर संमती विकल्प (Consent Submission) सादर करण्याची अथवा त्यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**७.६.३** तात्पुरत्या निवड यादीस अनुसरून लागू असेल त्याप्रमाणे भरतीप्रक्रियेतून बाहेर पडण्याचा (ऑप्टिंग आऊट), 'संमती विकल्प (Consent Submission)' इत्यादीचा पर्याय सादर केलेल्या उमेदवारांचा विदा (Data) लक्षात घेऊन संवर्गनिहाय अंतिम शिफारस यादी (Final Recommendation List) तयार करण्यात येईल.

**७.६.४** महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवेतील संवर्गांकरीता आयोगाच्या धोरणानुसार प्रतिक्षा यादी राहील.

**८. शिफारस:-**

**८.१** **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे करण्यात येतील.

**८.२** सर्व संवर्गाकरीता मुख्य परीक्षेमधून पात्र होण्याकरीता शतमत (**Percentile**) पध्दत लागू राहील.

**८.३** प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवाराच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी तसेच शारीरिक चाचणीसाठी पात्र असतील:-

**(१) अमागास- किमान ३५ शतमत**
**(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत**
**(३) दिव्यांग - किमान २० शतमत**
**(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत**
**(५) अनाथ - किमान ३० शतमत**

**८.४** समांतर आरक्षणाच्या आधारे किमान गुणांच्या सीमारेषेनुसार शिफारशीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारास कोणतीही एक सवलत देय राहील.

**८.५** शिफारसपात्र उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**८.६** शिफारशीनंतर नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, याबाबत उमेदवारांना प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल.

**९. प्रमाणपत्र पडताळणी:-**

**९.१** संबंधित मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार मुख्य परीक्षेच्या निकालापूर्वी, निकालानंतर अथवा नियुक्तीपूर्वी सक्षम प्राधिका-यांकडून बोलविण्यात येईल.

**९.२** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल.

**९.३** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणाऱ्या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**९.४** विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**९.५** प्रमाणपत्र पडताळणी यासंदर्भात निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**९.६** केवळ अर्जातील दाव्यानुसार करण्यात आलेल्या प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेले उमेदवार शिफारस/ नियुक्तीसाठी पात्र ठरतील.

**१०.** प्रस्तुत परीक्षा योजना/परीक्षा पद्धतीत उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत असल्यास त्या-त्यावेळच्या परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय अथवा आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील आणि यासंदर्भात आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

.

दिनांक:- ०९ ऑक्टोबर , २०२४

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.